# जीवन विकास सेवा संघ, चिपळूण
आणि
# ओतारी आई चॅरिटेबल फाऊंडेशन

बाजारपुल, नाईक कंपनी शेजारी, पहिला मजला,जीवन विकास सेवा संघ, चिपळूण, जि. रत्नागिरी,मो. ८९९९४३५१२९


**दिनांक 15/02/2025**



**ग्राम संघ बचत गट कापसाळ येथे भेट देऊन जीवन विकास सेवा संघ चिपळूण यांच्या माध्यमातून महिला आरोग्य विषयी तसेच महिला सक्षमिकरण आणि ब्रेन बूस्टर या विषयी मार्गदर्शन केले.**

**दिनांक 17/02/2025 रोजी**



**निरबाडे - येथे श्री.सुरेश महाडिक यांच्या घरी जीवन विकास सेवा संघ, चिपळूण आणि ओतारी आई चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या माध्यमातून संस्थेचे पदाधिकारी यांनी Visit केली. त्यावेळी श्री.सुरेश महाडिक यांची आर्थिक परिस्थिती जाणून घेतली व संस्थेच्या माध्यमातून श्री.सुरेश महाडिक यांना जीवनावश्यक वस्तूंचे किट देऊन मदतीचा हात पुढे केला .त्यावेळी निरबाडे गावातील श्री. महाडिक मॅडम तसेच चारगावचे अध्यक्ष .**

**व संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती. संगीता ओतारी मॅडम,पूजा मॅडम ,रविना पवार मॅडम व मंदार सर इत्यादी सदस्य उपस्थित होते.**

# जीवन विकास सेवा संघ, चिपळूण
आणि
# ओतारी आई चॅरिटेबल फाऊंडेशन

बाजारपुल, नाईक कंपनी शेजारी, पहिला मजला,जीवन विकास सेवा संघ, चिपळूण, जि. रत्नागिरी,मो. ८९९९४३५१२९


**दिनांक 04/03/2025**




**जीवन विकास सेवा संघ , चिपळूण . आणि ओतारी आई चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या माध्यमातून ग्रामपंचायत कापसाळ चिपळूण येथे आरोग्य व शारीरिक समस्या या विषयी चर्चा करण्यात आली. तसेच संस्थेचे [ PRO ] श्री. दीपक माळकरी यांनी मानसशास्त्रीय समुपदेशन व संमोहन तसेच मानसिक समस्यांवर चर्चा केली तसेच ब्रेन बुस्टर या विषयी Demo  देण्यात आला या वेळी संस्थेचे पदाधिकारी दीपक माळकरी व धनंजय काळे साहेब, पूजा पुजारी, मंदार पुजारी इत्यादी सदस्य उपस्थित होते.**

# जीवन विकास सेवा संघ, चिपळूण
आणि
# ओतारी आई चॅरिटेबल फाऊंडेशन



बाजारपुल, नाईक कंपनी शेजारी, पहिला मजला,जीवन विकास सेवा संघ, चिपळूण, जि. रत्नागिरी,मो. ८९९९४३५१२९


**दि – १२/०३/२०२५**



**जीवन विकास सेवा संघ, चिपळूण आणि ओतारी आई चॅरीटेबल फाऊंडेशन यांच्या माध्यमातून अद्भुत मानसिक क्षमतांचे सादरीकरण**

चिपळूण — जीवन विकास सेवा संघ,चिपळूण आणि ओतारी आई चॅरीटेबल फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत विद्यार्थ्यांनी आपल्या अद्भुत मानसिक क्षमतांचे प्रदर्शन करून उपस्थितांचे मन जिंकले. या वेळी विद्यार्थ्यांनी डोळे बंद करून विविध गोष्टी ओळखण्याचे कौशल्य दाखवले. त्यांनी बंद डोळ्यांनी ओळखपत्रे, कार्टून पात्रे, चलनी नोटा आणि त्यांच्या क्रमांकांची ओळख करून दिली.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार सतीश कदम, गजेंद्र खडपे (GSK News), राज पिलके (रत्नागिरी टाईम्स), सुनील देसाई (पुढारी) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगीता ओतारी होत्या.संस्थेच्या सेक्रेटरी सौ.शर्मिला धुरी मॅडम तसेच, जनसंपर्क अधिकारी आणि मानसशास्त्रतज्ज्ञ दिपक माळकरी, महिला सक्षमीकरणाच्या अध्यक्ष मंदार पुजारी, आरोग्य विभागाच्या सौ. पूजा मॅडम, स्टाफ सदस्य रवीना पवार , सामाजिक कार्यकर्ते परब आणि आचार्य ऋषभ जी यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात संगीता ओतारी मॅडम यांनी सूत्रसंचालन करून दिली. त्यानंतर दीपक माळकरी यांनी विद्यार्थ्यांच्या मेंदूशक्ती सक्रियतेच्या प्रक्रियेविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या अद्वितीय कौशल्याने उपस्थित सर्वांना आश्चर्यचकित केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. जिवन विकास सेवा संघाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि मानसिक क्षमता वाढीस लागेल,

बाजारपुल, नाईक कंपनी शेजारी, पहिला मजला,जीवन विकास सेवा संघ, चिपळूण, जि. रत्नागिरी,मो. ८९९९४३५१२९


दि – १२ /०१ /२०२५



स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी केली गेली असून त्याचबरोबर निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धांचे पारितोषिक वितरण समारंभ .

# जीवन विकास सेवा संघ, चिपळूण
आणि
# ओतारी आई चॅरिटेबल फाउंडेशन

बाजारपुल, नाईक कंपनी शेजारी, पहिला मजला, जीवन विकास सेवा संघ, चिपळूण, जि. रत्नागिरी, मो. ८९९९४३५१२९

दि - ३/०४/२०२५




**विद्यार्थ्यांचे अद्भुत मानसिक कौशल्य! 'ब्रेन बूस्टर' कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद.**

**पेढे परशुराम, ३ एप्रिल २०२५ : भगवान परशुराम पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या आर. सी. काळे माध्यमिक विद्यालयात 'ब्रेन बूस्टर' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जीवन विकास सेवा संघ आणि ओतारी आई चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या अद्भुत मानसिक क्षमतांचे प्रभावी प्रदर्शन घडवले.**

**कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी डोळे झाकून विविध वस्तू अचूक ओळखण्याचे विलक्षण कौशल्य सादर केले. ओळखपत्रे, कार्टून पात्रे, चलनी नोटा आणि त्यांचे क्रमांक केवळ स्पर्शाच्या आधारे ओळखून त्यांनी उपस्थित प्रेक्षकांना अचंबित केले. हा प्रयोग मुलांच्या मेंदूच्या कार्यक्षमतेत वाढ करणारा ठरला असून, स्मरणशक्ती आणि एकाग्रता विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरतो, असे मार्गदर्शन करत मानसशास्त्र तज्ञ दीपक माळकरी सर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.**

**या प्रयोगात सहभागी विद्यार्थी : सोनाक्षी , सुप्रिया , शिवम , श्रेया यादव.**

**या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.**

**कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी [ संस्थापिका ] संगीता ओतारी मॅडम,{ आरोग्य विभागाच्या ] सौ. पूजा पुजारी. महिला सक्षमीकरणाचे अध्यक्ष मंदार पुजारी यांची महत्त्वाची भूमिका राहिली. तसेच आर. सी. काळे विद्यालयाचे शिक्षक आणि कर्मचारी, जसे की - मुरसिदधा पडवळे , सुधीर सावर्डेकर , नितेश गमरे विशाखा माळी उज्वला दवंडे , नितीन रेपाळ विजय आयरे संदेश पवार दीप्ती सुर्वे आणि स्वरूपा कदम - यांनी देखील उपस्थित राहून कार्यक्रमाला प्रेरणादायी स्पर्श दिला.**

**'ब्रेन बूस्टर' कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये नवचेतना निर्माण केली असून, त्यांची मानसिक क्षमता विकसित करण्यासाठी याचा मोठा फायदा होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.**

# जीवन विकास सेवा संघ, चिपळूण
आणि
# ओतारी आई चॅरिटेबल फाऊंडेशन

बाजारपुल, नाईक कंपनी शेजारी, पहिला मजला,जीवन विकास सेवा संघ, चिपळूण, जि. रत्नागिरी,मो. ८९९९४३५१२९


दि - ३१/०३/२०२५




ओतारी आई चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे नाईक कंपनी शेजारी, चिपळूण येथे ध्यान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा खूप उत्साह लाभला. आणि ध्यानाचे तंत्र व त्याचे महत्व समजून घेण्यासाठी अनेक उत्साही सहभागी झाले.

या शिबिराला पोलीस उपविभागीय अधिकारी राजेंद्रकुमार राजमाने यांनी विशेष उपस्थिती लावली तसेच प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ आणि वरिष्ठ समुपदेशक अनिल पुनवतकर आणि मानसशास्त्रज्ञ दिपक माळकरी यांनी मार्गदर्शन केले.त्यांनी ध्यान कसे करावे , त्याचे मानसिक आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम आणि त्याचा दैनंदिन जीवनातील उपयोग याविषयी सखोल माहिती दिली.

ओतारी आई चॅरिटेबल फाउंडेशनच्या [ संस्थापिका अध्यक्ष ] संगीता ओतारी यांनी या कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्वांचे आभार मानले .या शिबिरात पत्रकार शेखर धोंगडे , मंदार पुजारी ,पूजा पुजारी रविना पवार . सामाजिक कार्यकर्ते प्रशांत परब यांनीही सक्रीय सहभाग घेतला.

# जीवन विकास सेवा संघ, चिपळूण
आणि
# ओतारी आई चॅरिटेबल फाऊंडेशन

बाजारपुल, नाईक कंपनी शेजारी, पहिला मजला,जीवन विकास सेवा संघ, चिपळूण, जि. रत्नागिरी,मो. ८९९९४३५१२९


**दि- 01/05/2025**



**"निसर्गाच्या गाठीभेटी - जीवन विकास सेवा संघाचा प्रेरणादायी संवाद!"**

**आज चिपळूणमध्ये निसर्गाशी संवाद साधताना शब्द नव्हे, तर अनुभव बोलत होते! जीवन विकास सेवा संघ आयोजित "निसर्गप्रेमींशी संवाद" या अनोख्या स्नेहमेळाव्यास साऱ्या परिसरातील पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी, वनअधिकारी, शिक्षक व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने हजेरी लावली.**

**"साप" हा फक्त भीतीचा विषय नाही... तो एक जैववैज्ञानिक शिक्षक आहे!**

**या संवादाचा केंद्रबिंदू ठरले ज्येष्ठ सर्पमित्र व निसर्ग अभ्यासक मा. दिनकर चौगुले. त्यांनी अंधश्रद्धा, सर्पमित्र कार्य, निसर्ग संवर्धन, आणि वैज्ञानिक दृष्टिकोन याबद्दल जे सांगितलं, ते थेट श्रोत्यांच्या मनात खोलवर रुजलं. त्यांच्या अनुभवकथनात ना कुठली भीती होती, ना नाटकी प्रभाव - होता तो फक्त वास्तव, आणि निसर्गाशी नाळ जोडणारा एक सत्यस्पर्श!**

**सजग मनं, सजग विचार - व्यासपीठावर मान्यवरांची शृंखला**

**कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा संगीता ओतारी, मानसशास्त्रज्ञ दीपक माळकरी, प्रा. अनिल पुनवतकर, वनविभागाचे राहुल गुंटे सर, सर्पमित्र बाळा शिर्के, आणि स्वयंसेविका तेजस ओतारी मॅडम यांची उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन पूजा पुजारी मॅडम यांनी नेटकेपणाने आणि प्रभावी शब्दांनी साकारले.**

**संघटनेचा पुढचा निर्धार – संवादाची मालिका आणि सजगता अभियान!**

**हा कार्यक्रम म्हणजे संवादाची सुरुवात होती. संघटनेने जाहीर केलं की, अशा प्रकारच्या संवादमालिका भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहेत – ज्यामधून निसर्ग, विज्ञान आणि माणूस यांच्यातला दुवा अधिक घट्ट होणार आहे.**

**दि - 13/12/2024**

कार्तिकी हेल्थ केअर तर्फे दंत चिकित्सा



चिपळूण : शहरातील जीवन विकास सेवा संघ, ओतारी आई फाऊंडेशन व कार्तिकी हेल्थ केअर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दंत चिकित्सा व प्राथमिक उपचार मोफत शिबीर आयोजित करण्यात आले. खेड येथील योगिता दंत महाविद्यालयाने यासाठी सहकार्य केले. या शिबिराला चिपळूणकरांनी चांगला प्रतिसाद दिला.

शहरातील जीवन विकास सेवा संघाच्या सभागृहात सकाळी १० वाजता या शिबिराची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी संस्थेचे पदाधिकारी, डॉक्टर्स, डेन्टल कॉलेज चा स्टाफ यांनी चर्चा केली व पुढील काळात अशा लोकोपयोगी उपक्रमांची व्याप्ती गाव पातळीपर्यंत वाढविण्याची तयारी दर्शविण्यात आली.

दातांची काळजी काशी घ्यावी, किडलेले दात, रूट क्यानल, दातांची सूज, हिरड्यांचा आकार, दात दुखी व त्यावरील तपासणी आणि माहिती तज्ञ डॉक्टर्सनि दिली. जीवन विकास सेवा संघ चिपळूण च्या संस्थापिका अध्यक्षा संगीता ओतारी, पदाधिकारी धनंजय काळे, शर्मिला धुरी, अश्विनी तांबे, प्रशांत परब व सहकारी उपस्थित होते. दंत महाविद्यालया तर्फे ओम गंगावणे,अश्विनी घुले, मुक्ताई मुंढे, अलिशा कामेरकर, रूपाली मदणे, साक्षी पडगीळवर यांनी रुग्णांवर उपचार केले. कार्तिकी हेल्थ केअर ट्रस्ट चे उपाध्यक्ष डॉ. राजन सकटे, सचिन अशोक धाडवे, यशवंत धाडवे, महादेव येसने, बंधु दळि यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.



**मानसिक आरोग्यासाठी चिपळूण पोलिस ठाण्यात विशेष उपक्रम**
**जीवन विकास सेवा संघा'तर्फे मेडिटेशन, थेरपी व समुपदेशन सेवा**

**चिपळूण | १३ मे २०२५ | प्रतिनिधी**

**चिपळूण पोलिस ठाण्यात 'जीवन विकास सेवा संघ, चिपळूण' यांच्यावतीने पोलिस कर्मचाऱ्यांसाठी मानसिक आरोग्यविषयक विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात ध्यान, ब्रेन बस्टर थेरपी आणि थोडक्याच स्वरूपातील फिजिओथेरपी सेवा देण्यात आली.**

**मानसशास्त्रज्ञ दिपक माळकरी यांनी पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (PTSD), तणाव, नैराश्य, झोपेच्या समस्या, चिडचिड, सततची चिंता इत्यादी मानसिक अडचणींवर सखोल माहिती व मार्गदर्शन दिले. "ब्रेन बस्टर थेरपी" चा अनुभव देऊन ध्यानातून मनःशांती साधण्याचे तंत्र त्यांनी प्रत्यक्ष शिकवले.**

**या उपक्रमात वायब्रेशन मशीन, इलेक्ट्रिक सिम्युलेशन मशीन आणि मॅट्स चा वापर करून सेवा देण्यात आली.**

**कार्यक्रमाच्या आयोजनात DYSP राजमाने सर यांचा विशेष पुढाकार होता. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सौ. संगीता ओतारी, आरोग्य विभागाच्या सौ. पुजा पुजारी, रविना पवार (स्टाफ प्रतिनिधी) आणि समाजसेवक रवींद्र शिंदे हे मान्यवर उपस्थित होते.**




**दि 17 / 06/2025**

**❁ चिपळूण : शहरांतील जीवन विकास सेवा संघ आणि ओतारी आई चॅरिटेबल फाऊंडेशन व मेट्रो ऑप्टिकल्स यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र चिकित्सा तपासणी शिबीर करण्यात आली. चिपळूण येथील बिलाल मणियार यांनी शिबिरासाठी सहकार्य केले.**

**या शिबिराला खेंड चिपळूण यांनी चांगला प्रतिसाद दिला.**

**शहरातील खेंड गणपती मंदिरा जवळ सकाळी 11.00 वाजता या शिबिराची सुरुवात करण्यात आली. डॉक्टर्स आणि (स्टाफ सदस्य ) नर्स व आशा अणि मेट्रो ऑप्टिकल्सचे (स्टाफ सदस्य )हमीद सय्यद व संदेश शिगवण यांनी चर्चा केली. पुढील काळात अशा लोकोपयोगी उपक्रमाची व्याप्ती गाव पातळीपर्यंत वाढविण्याची तयारी दर्शविण्यात आली.**

**👁डोळ्यांची काळजी कशी घ्यावी.....**

**डोळ्यांच्या रोगांचे उपचार करतात. आणि मोतीबिंदू काढणे व लेसर प्रक्रिया यांसारख्या शस्त्रक्रिया करतात. आणि सुधारात्मक लेन्स लिहुन देतात. त्यावरील तपासणी बद्दल माहिती त्यांनी दिली..**

**जीवन विकास सेवा संघांचे**
**संस्थापिका अध्यक्ष - संगीता ओतारी**
**मानसशास्त्रज्ञ – दिपक**

दि - 27/06/2025




**जीवन विकास सेवा संघ व ओतारी आई चॅरिटेबल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पाग कन्या शाळा नं 1 . येथे आरोग्याची**
**जनजागृती कॅम्प आयोजित करण्यात आला होता ,**
**हा उपक्रम आरोग्यविषयक जागरुकतेसाठी एक प्रेरणादायी पाऊल ठरला. कार्यक्रमामध्ये डॉ. प्रज्ञा कांबळी त्यांचे सहकारी व स्टाफ नेत्र चिकित्सक डॉ.घाटे आणि त्यांचे सहकारी सिद्धेश गायकर यांच्या सहकार्याने ग्रामस्थ आणि विद्यार्थांची नेत्र चिकित्सा व आरोग्य तपासणी करण्यात आली. प्रत्येकाच्या आजारानुसार त्यांचे निदान करून त्यांना औषधे मोफत देण्यात आली.**
**विशेष म्हणजे मानसशास्त्रज्ञ दिपक माळकरी यांनी जीवन विकास सेवा संघाच्या ब्रेन बुस्टर व मानसिक समुपदेशन केंद्राविषयी आणि व्यक्तीमत्व विकासाविषयी उपस्थित ग्रामस्थांना माहिती दिली. व उपस्थित ग्रामस्थांनी आपल्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे किती महत्वाचे आहे.याची जाणीव करून दिली त्यानंतर आरोग्य विभागाच्या पूजा पुजारी यांनी संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या मोफत फिजिओथेरपी केंद्राविषयी माहिती देऊन संस्थेच्या विविध समाजोपयोगी कार्यक्रमांची माहिती दिली. तसेच संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या झुम्बा क्लासेस आणि योगा क्लासेसमध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचा समारोप करताना गावोगावी , शाळा ,कॉलेज मध्ये आणि समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत अशीच आरोग्याची जनजागृती करण्याचा आमचा संकल्प आहे. हा कार्यक्रम केवळ एक तपासणी शिबीर नसून तो आरोग्य, आनंद आणि जनजागृती यांचा संगम होता जिथे मन , शरीर आणि समाज या तिन्ही आरोग्याची दिशा उजळून निघाली असे मतकार्यक्रमानंतर उपस्थितांनी व्यक्त केले.**



दि – 13/06/2025

*मालघरमध्ये आरोग्य आणि मानसिक आरोग्य शिबिर – रुग्णांसह सेवकांचाही मानसिक साक्षात्कार*
*जीवन विकास सेवा संघ, ओतारी आईचा चारीरटेबल फाउंडेशन आणि आरती फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उपक्रम*
*मालघर* – "रुग्णांची सेवा करताना सेवकांचे मानसिक आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे," या उदात्त भावनेतून मालघर येथील *आरती निराधार फाउंडेशन* येथे *आरोग्य व मानसिक आरोग्य शिबिर* आयोजित करण्यात आले. *जीवन विकास सेवा संघ, **ओतारी आईचा चारीटेबल फाउंडेशन* आणि *आरती फाउंडेशन* यांच्या संयुक्त प्रयत्नांतून झालेल्या या शिबिराने अनेकांना नवसंजीवनी दिली.
*शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा समतोल दृष्टिकोन*
शिबिराच्या प्रारंभी *डॉ. कुंदन ओतारी* यांनी निराधार रुग्णांची वैद्यकीय तपासणी करून त्यांच्यासाठी आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले. त्यानंतर *मानसशास्त्रज्ञ दिपक माळकरी* यांनी रुग्णांसह सेवकांचे समुपदेशन करत त्यांच्या मनातील ताणतणाव, नैराश्य, आत्मशंका आणि चिडचिड या मानसिक अडचणींवर मार्गदर्शन केले.

### *सेवा देताना मानसिक आरोग्याची काळजी*
मानसशास्त्रज्ञ *दिपक माळकरी* हे मानसिक आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेले संवेदनशील आणि प्रभावी समुपदेशक आहेत. त्यांनी *बर्नआऊट सिंड्रोम, **सेल्फ-डाऊट, आणि **दीर्घकाळ मानसिकदृष्ट्या अस्थिर रुग्णांमध्ये कार्य करताना सेवकांवर होणारा भावनिक ताण* यावर अत्यंत परिणामकारक मार्गदर्शन केले.

"सेवा देताना स्वतःच्या मानसिक आरोग्याची काळजी कशी घ्यावी?" यावर त्यांनी *सहज आणि मनोवेधक शैलीत संवाद साधून* उपस्थित सेवकांना आत्मपरीक्षणाची प्रेरणा दिली. त्यांच्या प्रभावी समुपदेशनामुळे उपस्थित सेवकांना *भावनिक सक्षमता वाढवण्याचे महत्व* अधोरेखित झाले.

*मानसिक आरोग्याचा व्यापक दृष्टिकोन*
शिबिरात *"मानसिक आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर सकारात्मक विचार, भावनिक समतोल, आत्मविश्वास आणि सामाजिक सहभाग यांचा संगम आहे,"* हे स्पष्ट करण्यात आले. या दृष्टीकोनातून *सेवकांचे व्यक्तिगत समुपदेशन, **मानसिक तणाव ओळखण्याचे प्रशिक्षण, आणि **व्यावसायिक सक्षमता वाढवण्यावर भर* देण्यात आला.

*उपस्थित मान्यवर आणि संस्थेचा उद्देश*
*संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा संगीता ओतारी मॅडम* यांनी संस्थेच्या *स्थापनेचा इतिहास*, तिचे ध्येय आणि काम करताना आलेल्या अडचणींवर प्रकाश टाकला. "अशा उपक्रमांमधून व्यापक स्तरावर मानसिक आरोग्यप्रश्न सोडवणे शक्य आहे," असे त्यांनी नमूद केले.

*या शिबिरात डॉ. कुंदन ओतारी, आरोग्य अधिकारी पूजा पुजारी, मानसशास्त्रज्ञ दिपक माळकरी, आरती फाउंडेशनच्या संस्थापिका नारकर मॅडम आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.*

*कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये*:
✅ *शारीरिक तपासणीसह मानसिक आरोग्यावर विशेष भर*
✅ *सेवकांचे व्यक्तिगत समुपदेशन*
✅ *मानसिक तणाव ओळखण्याचे प्रशिक्षण व उपाययोजना*
✅ *सेवा देणाऱ्यांच्या मानसिक सक्षमता वाढवण्याचा प्रयत्न*

💬 *"रुग्णसेवेबरोबरच सेवकांची मानसिक सशक्तता हाच खरा दीर्घकालीन बदलाचा पाया आहे,"* असे आयोजकांचे मत होते.



**09/07/2025**

**चिपळूण - जीवन विकास सेवा संघ व ओतारी आई चॅरिटेबल फाऊंडेशन तर्फे चिपळूण शहर व ग्रामीण भागातील शाळांमधील विद्यार्थांना मागणीनुसार मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम सुरु आहे. गरीब परिस्थितील विद्यार्थांचे सर्वेक्षण ही प्रत्यक्ष भेटीतून केली जात आहे. जीवन विकास संघाने परिसरातील 10 शाळांमध्ये या कार्यक्रमाबरोबरच सोयी सुविधा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न सुरु असल्याबद्दल समाधान वाटते, यातून शैक्षणिक उत्तम परिणाम साध्य होईल ,असा विश्वास या संस्थेच्या संस्थापिका संगीता ओतारी यांनी व्यक्त केले.**

**कापसाळ येथील मराठी शाळा नं 1 मधे संस्था व शाळेच्यावतीने आयोजित वह्या वाटप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. शाळेतील सर्व विद्यार्थांना वह्या प्रदान करण्यात आल्या. 15 दिवसापूर्वी संस्थेच्या सामाजिक, आरोग्य व बुद्धिमत्ता विकास उपक्रमाची माहिती टीमद्वारे देण्यात आली. संस्थेने आतापर्यंत चिपळूण व आसपासच्या परिसरात अनेक सेवाभावी उपक्रम राबविले आहेत. परिस्थिती अभावी शैक्षणिक प्रगतीमध्ये अडचणी निर्माण झाल्यास त्या कुटुंबाना संस्थेने सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहे. ब्रेन बुस्टरसारख्या शास्त्रशुद्ध उपक्रमाचा लाभ संस्थेतर्फे देण्यात येत आहे. या बाबतची माहिती शाळा शाळांमध्ये संस्थेचे प्रतिनिधी देत आहेत. अशा उपक्रमांचा स्वीकार केला जात असल्याबद्दलचा आनंद शाळा शाळांमधून व्यक्त केला जात आहे. महिला सक्षमीकरणाचा भाग म्हणून त्यांना आरोग्य संपन्न व आत्मा निर्भर करण्याचा प्रयत्न संस्थेचा विविध विभागांमार्फत केला जात आहे. कापसाळ शाळेत या सर्व उपक्रमांची माहिती [ मानसशास्त्रज्ञ ] दिपक माळकरी यांनी दिली. या कार्यक्रमाला मनोहर झगडे , सौ. मोहिनी मनोहर झगडे , सुलभा मोरे , सुमित सुर्वे उपस्थित होते. या उपक्रमांबद्दल मुख्याध्यापिका सौ.अपर्णा भुवड यांनी शुभेच्छा दिली.**

**सामाजिक विभागाचे - धनंजय काळे , संस्थेच्या सेक्रेटरी - शर्मिला धुरी ,मानसशास्त्रज्ञ - दिपक माळकरी, संस्थेच्या आरोग्य विभाग प्रमुख पुजा पुजारी , स्टाफ - रविना पवार व सहकारी टीम संस्थेच्या उपक्रमांबाबत जनजागृती करीत आहेत .**




**दि -10/07/2025**

**गुरुपौर्णिमेनिमित्त "जीवन विकास सेवा संघ" तर्फे ध्यानसत्राचे यशस्वी आयोजन**
**— महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; अंतर्मनाशी संवाद साधणारा अनुभव**

**चिपळूण | आज गुरुपौर्णिमेनिमित्त जीवन विकास सेवा संघ तर्फे एक खास ध्यानसत्र आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. "आपल्या अंतर्मनातील गुरुला भेट" या संकल्पनेवर आधारित हे सत्र महिलांना अंतर्मुख करणारे आणि मन:शांती देणारे ठरले.**

**या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या संस्थापिका व अध्यक्ष संगीता ओतारी यांच्या पुढाकाराने करण्यात आले.**
**त्यांनी संघाच्या माध्यमातून आजपर्यंत महिलांसह समाजातील विविध घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवला आहे.**
**त्यांच्या कार्यातून समर्पण आणि प्रेरणा दिसून येते, याबद्दल उपस्थित महिलांनी त्यांचे आभार मानले.**

**कार्यक्रमात संघाच्या सेक्रेटरी सौ. शर्मिला धुरी, मानसशास्त्रज्ञ दिपक माळकरी, महिला आरोग्य विभाग प्रमुख सौ. पूजा पुजारी, तसेच संघाच्या सदस्या  रवीना पवार उपस्थित होत्या.**

**कार्यक्रमाची सुरुवात मानसशास्त्रज्ञ दीपक माळकरी यांच्या शुभेच्छा व मार्गदर्शनाने झाली.**
**त्यांनी गुरुपौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर आपल्या अंतर्मनातील "गुरु" म्हणजेच आत्मचिंतनाची गरज आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व उलगडून सांगितले.**
**त्यानंतर त्यांनी सोप्या भाषेत मेंदूचे कार्य, मनाची प्रतिक्रिया, आणि ध्यानाच्या शास्त्रीय पद्धती याविषयी माहिती दिली.**

**विशेष म्हणजे त्यांनी उपस्थित महिलांना ध्यानप्रक्रियेमार्फत एका अंतर्मुख प्रवासावर नेले – जिथे त्यांनी स्वतःच्या मनाशी संवाद साधला.**
**या अनुभवामुळे उपस्थित महिलांना मानसिक विश्रांती व अंतर्गत शक्तीची जाणीव झाली.**

**कार्यक्रमाच्या समारोपात महिलांनी या सत्राचे मन:पूर्वक कौतुक केले आणि “अशा उपक्रमांची पुनरावृत्ती व्हावी” अशी इच्छा व्यक्त केली.**
**तसेच मानसशास्त्रज्ञ दिपक माळकरी यांनी संघाच्या समुपदेशन केंद्राविषयी आणि सामाजिक कार्याविषयी माहिती देत सर्वांना मार्गदर्शन केले.**



दि. (24/06/2025 ),

जीवन  विकास सेवा संघ – शाळा भेट
"स्थळ: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कापसळ (पायर)

 जीवन विकास सेवा संघाच्या वतीने शाळेत Brain Buster या नावीन्यपूर्ण उपक्रमाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांचे समुपदेशन (Counselling) करून त्यांचे भावनिक व शैक्षणिक प्रश्न समजून घेतले गेले.

यावेळी उपस्थित मान्यवर:

✒ ज्येष्ठ पत्रकार श्री. धनंजय काळे
 मानसशास्त्रज्ञ मा. दीपक माळकरी सर
महिला विभागाच्या पूजा पुजारी मॅडम
शाळेच्या मुख्याध्यापिका आराधना खेडेकर मॅडम
शिक्षिका अदिती खेडेकर मॅडम
आरोग्य अधिकारी डॉ. ज्योती यादव आणि त्यांचे सहकारी

✨ या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांच्या मानसिक, शैक्षणिक व सामाजिक विकासास चालना देणे हा होता.

जीवन विकास सेवा संघ पुढेही अशा उपक्रमांमधून शाळांमध्ये पोहोचत राहील, विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करत राहील



दि - 06/07/2025

आषाढी एकादशीला 'जीवन विकास सेवा संघ' च्या कार्यक्रमाला महिलांचा प्रचंड प्रतिसाद!

चिपळूण (प्रतिनिधी):
जीवन विकास सेवा संघाच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त आयोजित कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीचे पारंपरिक पद्धतीने पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. महिलांनी विठुरायाची भक्तिगीते म्हणत आनंदाने नृत्य करून वातावरण भक्तिमय केले.

या प्रसंगी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा  संगीता ओतारी यांनी आपला जीवनप्रवास उलगडत महिलांशी संवाद साधला. त्यांनी संस्थेच्या स्थापनेमागची प्रेरणा सांगताना सामाजिक कार्यासाठी वाटचाल कशी सुरू झाली, हे स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, "ही संस्था माझ्या वैयक्तिक अनुभवातून जन्माला आली असून, समाजातील सर्व घटकांना मदत करणे हाच या संस्थेचा उद्देश आहे."

कार्यक्रमात त्यांनी आपल्या जवळच्या सखी आणि संस्थेच्या सचिव सौ. शर्मिला धुरी यांच्याशी असलेल्या मैत्रीचे किस्से शेअर करत महिलांमध्ये हास्यविनोदाची आणि जिव्हाळ्याची लहर पसरवली. त्यांच्या मैत्रीतील सहकार्य आणि विश्वासाची आठवण करून दिली.

कार्यक्रमात आरोग्य विभाग प्रमुख पूजा पुजारी, तसेच स्टाफ सदस्य रवीना पवार यांनीही आपली उपस्थिती नोंदवली. झुंबा आणि योगा क्लासेस, फिजिओथेरपी सेवा, आणि मानसिक समुपदेशन याबाबत महिलांना माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्साहात पार पडले. महिलांनी विठ्ठल नामस्मरणात रमून, एक सुंदर अध्यात्मिक अनुभव घेतला.

📌 कार्यक्रमातील विशेष क्षण:

विठ्ठल-रुक्मिणी पूजन आणि दीपप्रज्वलन

महिलांचे सामूहिक भजन, अभंग आणि नृत्य

संगीता ओतारी  यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास

महिलांमध्ये जिव्हाळ्याचा संवाद

**दिनांक: 29/05/2025**

**जीवन विकास सेवा संघाच्या वतीने दिनांक 29 मे 2025 रोजी मालघर येथील आरती निराधार फाउंडेशन या वृद्धाश्रमाला सदिच्छा भेट देण्यात आली. या वेळी आरोग्य विभागाच्या पुजा पुजारी, मानसशास्त्रज्ञ दिपक माळकरी ,आणि स्टाफ रवीना पवार हे प्रत्यक्ष उपस्थित होते.**
**या भेटीत वृद्धाश्रमातील निराधार, अंध, विकलांग आणि एकटेपणाने जीवन जगणाऱ्या वृद्धांशी संवाद साधण्यात आला. त्यांचं भावनिक व आरोग्यदृष्ट्या स्थिती समजून घेतली असता अनेक गोष्टी समोर आल्या.**

**◆ मुख्य निरीक्षणे – काय जाणवले?**
**बहुतांश वृद्धांची आजपर्यंत एकाही प्रकारची आरोग्य तपासणी झालेली नाही.**
**ऋतू बदलामुळे त्यांना त्रास जाणवत आहे – सर्दी, ताप, सांधेदुखी, थकवा वाढत आहे.**
**काही वृद्ध मानसिकदृष्ट्या अस्वस्थ आहेत – नैराश्य, असहाय्यता आणि संवादाचा अभाव जाणवतो.**
**काहीजण अंध किंवा विकलांग आहेत – त्यांचं व्यवस्थापन करताना कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणी येत आहेत.**
**स्टाफ सदस्यांचाही मानसिक तणाव जाणवतो – त्यांना समुपदेशनाची गरज आहे.**

**◆ यावरून ठरलेली कृती योजना – आपण काय करणार?**

**1. अनुभवी डॉक्टरच्या मदतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करणे**
**2. वृद्धांसाठी ध्यान व श्वसन साधना कार्यक्रम (Meditation) घडवून आणणे.**
**3. मानसिकदृष्ट्या खचलेल्या वृद्धांसाठी समुपदेशन सत्र घेणे.**
**4. स्टाफसाठी स्ट्रेस मॅनेजमेंट व मानसिक स्वास्थ्य वर्कशॉप घेणे.**
**5. अंध व विकलांग वृद्धांसाठी विशेष साहाय्यात्मक कार्यक्रम तयार करणे.**

**ही भेट ही केवळ औपचारिक नव्हती, तर एका सामाजिक बांधिलकीची सुरुवात होती. जीवन विकास सेवा संघ आता पुढे येऊन या वृद्धांचे स्वास्थ्य, मानसिक शांती आणि जीवनमान उंचावण्यासाठी उपक्रम राबवणार आहे.**

**🙏 आपल्या सर्व सदस्यांनी या उपक्रमात मन:पूर्वक सहभागी व्हावे ही नम्र विनंती.**
**लवकरच कार्यक्रमाची दिनदर्शिका शेअर केली जाईल.**

**🌿 "सेवा हीच खरी साधना आहे."**